**वाचा :** १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३४व ३८६ (२) अन्वये.
२. सार्वजनिक उत्सवाकरीता, परिपत्रक जा.क्र. जापवि/ कक्ष-१/४३२/२०२० दि. ०७/०७/२०२०.
३. महापालिका ठराव क्र. २७२ दि. ११/०९/२०२३.

........................................................................................................................................

नाशिक महानगरपालिका, नाशिक
जा.क्र./जापवि/कक्ष-१/५६६/२०२३
दिनांक : ११ /०९/२०२३.

**आदेश :**

**विषय :** सार्वजनिक गणेशोत्सव-२०२३ करीता, मनपाच्या सार्वजनिक ठिकाणी तात्पुरता स्वरुपात उभारणी केलेल्या मंडप/स्टेज, कमान इ. परवानगी शुल्का बाबत..

नाशिक शहर हद्दीतील आगामी सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त दि.२५/०८/२०२३ रोजी आरास मंडप / स्टेजकरीता लागणारे परवानगी बाबत संबंधित अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये मंडळाचे पदाधिकारी तसेच मनपाचे स्थानिक मा. लोकप्रतिनिधी यांनी आगामी सार्वजनिक गणेशोत्सव-२०२३ निमित्त परवानगीसाठी आकारण्यात येणारे परवाना शुल्क माफ करणेकामी मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ३८६ (२) महापालिका ठराव क्र. २७२ दि.११/०९/२०२३ अन्वये नाशिक शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव-२०२३ करीता मनपा जागेवर मंडप/स्टेज व कमानी इ. चे परवाना शुल्क चालु आर्थिक वर्षाकरीता माफ करणेबाबत प्रस्ताव दि.०१/०९/२०२३ रोजी महासभेच्या पटलावर सादर करण्यात आला, त्यास संदर्भ क्र. ३ अन्वये महापालिका ठराव क्र. २७२, दि.११/०९/२०२३ सन २०२३ सार्वजनिक गणेशोत्सवकरीता मनपा जागेवरील मंडप / स्टेज व कमानी इत्यादींचे शुल्क र.रु. ७५०/- माफ करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु, जे गणेश मंडळे वाणिज्य स्वरुपाच्या जाहिराती प्रसिध्द केल्यास त्यांना जाहिरातीच्या आकारमानानुसार परवाना शुल्क व जाहिरात कर भरणा करणे अनिवार्य राहील.

तथापी वाचा क्र. २ चे परिपत्रकानुसार कार्यवाही अनुसरतांना मा. उच्च न्यायालयाचे / महाराष्ट्र शासनाचे निर्देशांचा / आदेशांचे परवाना प्राप्त केलेल्या गणेश मंडळांनी काटेकोरपणे पालन करणे क्रमप्राप्त आहे.

सबब, उक्त नमूद केलेप्रमाणे संदर्भ क्र. ३ चे महापालिका ठरावानुसार कमल ३८६ (२) नुसार आगामी सार्वजनिक गणेशोत्सव — २०२३ करीता मनपा जागेवर तात्पुरता स्वरुपात मंडप/स्टेज व कमानी इ. चे परवाना शुल्क र.रु. ७५०/- माफ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सन २०२३ करीता सार्वजनिक गणेशोत्सव - २०२३ करीता परवाना शुल्क र.रु. ७५०/- माफ केलेबाबत सण - उत्सवांची ऑनलाईन अज्ञावलीमध्ये तातडीने बदल करणे तसेच सदरचा आदेश मनपाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणे इ. बाबतची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाने तातडीने अनुसरण्यात यावी. सदरचा आदेश दि. ११/०९/२०२३ पासून लागू होईल.

सदरचा आदेश मात्र सार्वजनिक गणेशोत्सव - २०२३ करीता लागू राहील.

(डॉ. अशोक करंजकर)
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत - कार्यवाहीसाठी -**

१. अतिरिक्त आयुक्त (शहर) मनपा नाशिक.
२. उपआयुक्त (कर) मनपा नाशिक.
३. मुख्यलेखाधिकारी, मनपा नाशिक.
४. मुख्य वित्त व लेखा अधिकारी, मनपा नाशिक.
५. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा नाशिक.
६. सर्व विभागीय अधिकारी, मनपा नाशिक.
७. सर्व सार्वजनिक गणेश मंडळे.
८. आदेश फाईल.
९. स्थळप्रत.